महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानात वाढ करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांक-रिटपी-२०१८/प्र.क्र.२१०/का-०८

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख- ६ एप्रिल, २०२१.

**वाचा :-**

१. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग बालसं-२००५/प्र.क्र.९१/का-८ दि.११.११.२००५.
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१०७/२०१४ मध्ये दि.१२.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये दिलेले निर्देश.
३. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग बालगृ-२०१८/प्र.क्र.१६/का-८ दि.२६.०२.२०१८.
४. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग बालसं-२०११/प्र.क्र.३१३/का-८ दि.९.१०.२०१३.
५. मा. मंत्रीमंडळाच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :-**

अनाथ, निराश्रित, बेघर व अन्य प्रकारे आपत्तीत असलेल्या (Crisis) बालकांचे संस्थाबाह्य व कौटुंबिक वातावरणात संगोपन व्हावे, या दृष्टीने सदर मुलांना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्याचे संगोपन व विकास घडवून आणणे, या मुख्य उद्देशाने महिला व बाल विकास विभागामार्फत बाल संगोपन योजना राबविण्यात येते. संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये राज्यात सुधारित बाल संगोपन योजना राबविण्यात येत असून सदर शासन निर्णयान्वये योजनेचे नियम व मार्गदर्शक सूचना निश्चित केलेल्या आहेत.

२. मा.उच्च न्यायालयाचे निदेश व एकाच व्याख्येंतर्गत असलेल्या बालकांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यातील तफावत दूर करण्याकरिता बाल संगोपन योजनेंतर्गत बालकांचे संगोपन करणाऱ्या पालकांना व योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना प्रती बालक देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालयाचे निदेश व एकाच व्याख्येंतर्गत असलेल्या बालकांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यातील तफावत दूर करण्याकरिता बाल संगोपन योजनेंतर्गत बालकांचे संगोपन करणाऱ्या पालकांना प्रती बालक दरमहा देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानात रु.४२५/- वरुन रु.१,१००/- इतकी तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना सहायक अनुदानात प्रती बालक दरमहा रु.७५/- वरुन रु.१२५/- इतकी वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे सहायक अनुदानामध्ये होणारी वाढ दि.१ एप्रिल २०२१ पासून लागू राहील,सदरचे सहायक अनुदान लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात यावे.

३. सदरचे अनुदान संस्थांना देय होण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आल्यानुसार बालसंगोपन योजनेसाठी गरजू बालकांची निवड करणे, पालक कुटुंबांचा शोध घेणे, संगोपनकर्त्या कुटूंबास मार्गदर्शन करणे, देखरेख ठेवणे, गृह भेटी देणे,देखरेख व गृह भेटी अहवाल आयुक्तालयास सादर करणे, बालक निहाय संगणकीय तपशिल ठेवणे इत्यादी अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

४. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या तरतूदींचे काटकोरपणे पालन करण्यात येऊन अनाथ, निराधार अशा आत्यंतिक गरजू मुलांनाच संदर्भाधीन क्र.१ व ४ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या निकषानुसार बालसंगोपन योजनेचा लाभ देण्यात यावा.

५. सदर बाबीवरील होणारा खर्च मागणी क्र.एक्स-०१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०२ बाल कल्याण, (१५) बाल संगोपन योजना (संगोपन व काळजी), (१५) (०१) बालसंगोपन योजनेसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम), (२२३५ B ९०६) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करण्यात येणाऱ्या वेतनेत्तर सहायक अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०४०८१५३२४३९२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA SITARAM JARANDE

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=186d0f0fdd27c79b9b3f859a90ec537946c37d5876e64ce525d082e58e494c85, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBA, serialNumber=4d2dc3dbd5c0f35a66a84c93b4cead367c64cc2bc9d7391e9a053988a2f81b64, ou=WOMEN AND CHILD DEVLOPMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2021.04.08 15:36:35 +05'30'

**(र.सि.जरांडे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४. मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ,मुंबई.
६. मा.मंत्री (म व बा वि)/राज्यमंत्री ((म व बा वि),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई.
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.

९. प्रधान सचिव ( व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (ले व का), वित्त विभाग,मंत्रालय ,मुंबई.
११. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
१३. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१४. वित्त विभाग (व्यय-६), (अर्थसंकल्प-७), नियोजन विभाग (का.१४७२), मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व कार्यासने महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती/का-८.